दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १८१ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार, दि.६ मे २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## महाबळेश्वर येथे आयोजित महापर्यटन उत्सव-२०२५ चा शानदार समारोप

# पर्यटनाला चालना देण्यासाठी वर्षभराचे पर्यटन कॅलेंडर तयार करा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**महाबळेश्वर (वृत्तसंस्था)-महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ द्वारा महाबळेश्वर येथे आयोजित 'महापर्यटन उत्सव-२०२५' चा शानदार समारोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झाला. पर्यटन विकासासाठी पर्यटन विभागाने वर्षभारतील पर्यटनाचे वेळापत्रक तयार करून त्यात राज्याच्या विविध भागात वर्षभरात आयोजित उत्सव सोहळ्यांचा समावेश करावा. यासोबतच देशातील टूर ऑपरेटर्स सोबत कार्यशाळा घेऊन त्यांना इथल्या पर्यटन सुविधांची माहिती द्यावी. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून एकाच पोर्टलवर सर्व पर्यटन सुविधांची माहिती द्यावी, असे प्रतिपादन यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले.**

### पर्यटनामुळे रोजगार निर्मितीला चालना

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, उद्योग क्षेत्रात मोठी गुंतवणूक आल्यावर रोजगार निर्माण होतात, मात्र पर्यटन क्षेत्रात कमी गुंतवणूकीत अधिक रोजगार निर्माण होतात. मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करण्याची क्षमता या व्यवसायात आहे. पर्यटन क्षेत्रात पाचव्या क्रमांकावरून पहिल्या क्रमांकावर येण्याची क्षमता महाराष्ट्रात आहे. राज्याला पर्यटन क्षेत्रात पहिल्या क्रमांकावर आणण्याचे कार्य पुढील ५ वर्षात करण्यात येईल.

कार्यक्रमाला विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव (पाटील),आ. डॉ.अतुल भोसले, आ. सचिन पाटील, आदी उपस्थित होते.पर्यटन महोत्सवला उत्तम प्रतिसाद मिळाल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन करून मुख्यमंत्री म्हणाले, पर्यटन वाढीसाठी नागरी सुविधा आणि पर्यटन संस्कृती विकसित करणे गरजेचे आहे. पर्यटन संस्कृती विकसित करुन स्थानिकांचे सहकार्य पर्यटकांना सुखद अनुभव येण्यासाठी महत्वाचे आहे.शौर्य आणि निसर्ग सौंदर्याचा सुंदर मिलाफ महाबळेश्वर येथे पाहायला मिळतो. निसर्गाने सुंदर पश्चिम घाट आपल्याला दिला आहे, ७२० किलोमीटरचा समुद्रकिनारा दिला आहे, अनेक सुंदर पवित्र तीर्थक्षेत्रे आपल्याकडे आहेत, हे सौंदर्य देश परदेशात पोहोचविण्याचे काम आपल्याला करायचे आहे आणि हा महोत्सव त्यादृष्टीने महत्वाचा आहे.



### महाबळेश्वर हे देशातील उत्तम पर्यटनस्थळ


महाबळेश्वर हे देशातील सर्वोत्तम पर्यटनस्थळ असून त्याचे मोठ्या प्रमाणात मार्केटिंग करण्याची गरज आहे. महाबळेश्वर हे नवे गिरीस्थान म्हणून विकसित करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. . पुढचा पर्यटन महोत्सव कोयनेच्या बॅक वॉटर परिसरात घेऊन तेथील संस्कृतीचा पर्यटकांना परिचय करून देण्यात येईल, असे श्री. फडणवीस म्हणाले. पर्यटनाच्या क्षेत्रातील स्कुबा डायव्हिंगसारख्या नव्या कल्पना पुढे आणून राज्यातील पर्यटनाला चालना देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. कोयना बॅकवॉटर संबंधी असणारी बंधने दूर केल्याने तेथे चांगली पर्यटन व्यवस्था उभी राहत आहे. पुढील महापर्यटन उत्सव कोयना बॅकवॉटर क्षेत्रात घेण्यात येईल व पर्यटकांना या भागातील निसर्ग सौंदर्याचा आणि जल क्रीडांचा अनुभव घडविण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.


# वनपरिक्षेत्र कार्यालयात १२ एप्रिल पासून आगीचे तांडव! महत्वपूर्ण दस्तावेज व चारचाकी वाहन जळून खाक

## हे भानामतीचे की कोण्या व्यक्तीचे कृत्य : नागरिकात चर्चा

**भद्रावती । प्रतिनिधी**

वनविभाग क्षेत्राच्या कार्यालयास गेल्या १२एप्रिल पासून सातत्याने लहान- मोठी आग लागत आहे. दि.४ मे ला रात्रो ९.३० वाजता तर त्याठिकाणी उभ्या असलेल्या एका चारचाकी गाडीला अचानक आग लागली. त्यावर वन कर्मचाऱ्यांनी नियंत्रण मिळवल्याने पुढील अनर्थ टळला. यावेळी बघ्यांनी खूप गर्दी केली. विशेष म्हणजे लागत असलेल्या आगी त्या ठिकाणी कार्यरत क्षेत्र सहायक विकास शिंदे यांच्याशी संबंधित आहे. त्यांच्या कार्यालयाची कागदपत्रे आणि इतर साहित्याला आग लागत आहे हे विशेष. लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी बोलावलेली नगरपरिषदेची अग्निशमन गाडी आलीच नाही. त्या ठिकाणी उपस्थित कर्मचाऱ्यांनी पाणी मारून आग विझविली यात एमएच ३२- ५४३७ ही बेलोरे कंपनीची चार





चाकी गाडी जळून खाक झाली. सदर गाडी विकास शिंदे यांच्या मालकीची होती. आगी लागण्याच्या घटनांची सुरुवात दि.१२ एप्रिलला दुपारी १२.३० वाजताच्या घटनेपासून झाली. यात पहिल्या घटनेत वनविभागाच्या गोडाऊनला आग लागली. नंतर अधे-मध्ये आगी लागत राहिल्या. त्यात लाकुड, कार्यालय, रेकॉर्ड रूम मधील कागदपत्रे, फाईल, सिमेंट बॅग, खाली ऑईल पेंटचे डबे, ब्रश यासह इतर साहित्य जे शिंदे यांच्याशी संबंधित आहे ती जळून खाक झाले. हा भानामातीचा प्रकार आहे? की शिंदे यांचा बदला घेण्यासाठी कुणीतरी हा प्रकार करीत आहे. अशी शहरात चर्चा आहे. घडत असलेल्या या प्रकाराने विकास शिंदे हतबल झाले आहे. याबाबत त्यांना विचारणा केली असता डोळ्यात पाणी आणून त्यांनी मी कुणाचेही वाईट केले नाही. या प्रकाराने मी गोंधळून गेलो आहे अशी भावना व्यक्त केली. या घटनेने वनविभागातील वन अधिकारी, कर्मचारी तसेच आजूबाजूचे रहिवासी दहशतीत आहे. ते डोळ्यात तेल घालून हा प्रकार कोण घडवित आहे. याचा शोध घेत आहे. या आगीच्या प्रकरणाची पोलिसात तक्रार करण्यात आली आहे. ठाणेदार लता वाडिवे यांचे मार्गदर्शनात तपास सुरू आहे. या प्रकरणाकडे भद्रावतीकरांचे लक्ष लागले आहे.

# बँकेसमोर उभी असलेल्या कारमधून सोन्याच्या दागिन्यांसह बॅग पळवली

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या लोकविकास बँकेसमोर उभी केलेली कार फोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्याचे दागिने असलेली बॅग लंपास केल्याची धक्कादायक घटना शनिवारी (४ मे) दुपारी घडली. अवघ्या काही मिनिटांत घडलेल्या या प्रकारामुळे शहरात खळबळ उडाली आहे.

चांडगाव (ता. वैजापूर) येथील संदीप साळुंके यांच्या पत्नी आपल्या भावासमवेत वाघलगावहून परत येत असताना वैजापूर शहरातील लोकविकास बँकेसमोर त्यांनी आपली मारुती ८०० (MH 06 T 1712) ही कार थांबवली. त्यानंतर शेजारीच असलेल्या एका चप्पल दुकानात खरेदीसाठी गेले. केवळ काही मिनिटांत परत आल्यावर त्यांनी कारची पाहणी केली असता, कारमध्ये ठेवलेली बॅगच गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. बॅगमध्ये सुमारे आठ ते नऊ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने होते, अशी माहिती समोर आली आहे.

या घटनेची माहिती मिळताच सुदर्शन मोईन (रा. वाघलगाव) यांनी वैजापूर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासाची जबाबदारी पोलीस हेडकॉन्स्टेबल भगवान सिंघल यांच्याकडे देण्यात




आली आहे.गेल्या काही महिन्यांपासून वैजापूर शहरात वाहन फोडून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सार्वजनिक ठिकाणी वाहनात मौल्यवान वस्तू न ठेवण्याचा सल्ला पोलीस वारंवार देत असले तरी, अशा घटना पुन्हा पुन्हा घडत असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# पोटेगावच्या बंधाऱ्याचे प्रत्यक्षात काम सुरु

**सोलापूर । प्रतिनिधी**

अतिशय जुना कोल्हापूर पद्धतीचा पोटेगावचा बंधारा याचे काम प्रत्यक्षात सुरु झाल्याने गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. याआधी निलज, पोटेगाव, बाळे वाडी, पोथरे, बिटरगाव, बोरगाव येथील ग्रामस्थांनी आवाज उठवला होता. शेवटी माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी या कामाला गती दिली आणि अधिकारी वर्गाला त्यांची जबाबदारीची जाणीव करून दिली. त्याचाच परिणाम म्हणून हे काम अतिशय जलद गतीने सुरु झाले आहे.

जयवंतराव जगताप यांनी सांगितले की, अधिकारी जाधवर, खांडेकर, जेई सौंदणे यांचे या कामी विशेष सहकार्य लाभले असून, काम पूर्ण झाल्यावर या बंधाऱ्याच्या साईटवर या सर्व अधिकाऱ्यांचा मोठा सन्मान सोहळा आयोजित करणार आहेत. तसेच ठेकेदार भारत थिटे यांना एक तोळा सोन्याची अंगठी बक्षीस म्हणून देण्याचेही त्यांनी जाहीर केले आहे.



# अवधूत ज्वेलर्समध्ये धाडसी चोरी : दोन महिलां कडून ३२,००० रुपयांचे सोन्याचे इरिंग लंपास

**शिरूर । रमेश बनसोडे**

शिरूर तालुक्यातील मांडवगण फराटा गावात भरदुपारी एका प्रसिद्ध सराफा दुकानात घडलेली चोरीची घटना सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. अवधूत ज्वेलर्समध्ये दोन अज्ञात महिलांनी खरेदीच्या बहाण्याने येत चतुराईने ३२,००० रुपये किमतीची सोन्याची कानातील रिंग लंपास केल्याची माहिती समोर आली आहे. ही धक्कादायक घटना दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात महिलांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दिनांक ३ मे रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास दोन अनोळखी महिला ग्राहक असल्याचे भासवत अवधूत ज्वेलर्समध्ये दाखल झाल्या. फिर्यादी अमोल कचरू दहिवाळ (वय ३४, रा. रौनिकनगर सोसायटी, दौंड) यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी आणि त्यांच्या भावाने महिलांना विविध सोन्याचे दागिने दाखवले. त्याचदरम्यान, गर्दीचा फायदा घेत महिलांनी दुकानातील कलकत्ता ए प्रकारातील ४.२ ग्रॅम वजनाची, सुमारे ३२,००० रुपये किमतीची सोन्याची रिंग चोरी केली.चोरीची घटना लक्षात आल्यानंतर अमोल दहिवाळ यांनी तत्काळ शिरूर पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी गुन्हा रजिस्टर क्र. ३०२/२०२५ अन्वये भारतीय दंड विधानाच्या कलम ३७९ अंतर्गत गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. दुकानातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी महिलांची



हालचाल स्पष्ट झाली आहे. या फुटेजचा उपयोग करून पोलिसांनी परिसरातील इतर दुकानांचे आणि रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.

या प्रकरणाचा तपास स.फौ. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, पो.ह. २४९९ टेंगले यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. प्रभारी पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक कार्यरत आहे. पोलिसांनी या घटनेतील आरोपी महिलांचा लवकरात लवकर शोध घेण्याचा विश्वास व्यक्त केला आहे.या घटनेनंतर मांडवगण फराटा आणि परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सराफ व्यावसायिकांमध्ये सुरक्षा यंत्रणांविषयी चिंता वाढली आहे. पोलिसांनी नागरिकांना आणि व्यापाऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन करत, कोणतीही संशयास्पद व्यक्ती दिसल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

चोरीच्या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत विशेष पथक नेमले असून, सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने आरोपींचा माग काढला जात आहे. लवकरच महिलांना अटक करून या प्रकाराचा पर्दाफाश होईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# जनता महाविद्यालयाचे निकालात तेजोमय यश
# प्राविण्याच्या शिखरावर विद्यार्थ्यांची घौडदौड



**चंद्रपूर । प्रतिनिधी**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या बारावी सत्र २०२४-२५ चा निकाल आज (दि. ५) जाहीर झाला. यंदाही जनता कनिष्ठ महाविद्यालयाने आपल्या घवघवित यशाची परंपरा कायम ठेवत उल्लेखनीय निकालाची नोंद केली आहे.महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९९ टक्के, वाणिज्य शाखेचा निकाल ९३.०४ टक्के, कला शाखेचा निकाल ८८.७८ टक्के तर एम.सी.व्ही.सी. शाखेचा निकाल ५० टक्के लागला आहे.विज्ञान शाखेतील प्रमुख प्राविण्य प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे : कु. त्रिशा विजय होकम (९४.३३टक्के), कु. मानवी सुधीर कापसे (९१.१७टक्के), कु. नेन्सी जगन्नाथ प्रसाद (९१टक्के), कु. प्राची प्रवीण आबोजवार (९०.३३टक्के), अजीम अब्दुल वहाब फारुकी (८९.३३टक्के) व ओमकार अमर देवाळकर (८९.१७टक्के).
कला शाखेतील प्राविण्य प्राप्त विद्यार्थी : ज्ञानेश्वर गुरुदास थेरे (६५.८३टक्के), कु. प्रीती राजा काळे (६४.५०टक्के) आणि सुप्रीत विकास टिपले (६३.८३टक्के).
वाणिज्य शाखेतील प्राविण्य प्राप्त विद्यार्थी : देवांगशी संजय धकाते (८५.००टक्के), शुभांक नितीश दास (८४.६७टक्के) आणि मिस्बा फातिमा नौशाद सय्यद (८३.८३टक्के).
एम.सी.व्ही.सी. शाखेतील श्रीयुत अजय नक्षने (६४टक्के) हे प्राविण्यप्राप्त विद्यार्थी आहेत.या यशस्वी विद्यार्थ्यांचे मंडळाच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा जिवतोडे, संस्थेचे सचीव डॉ. अशोक जिवतोडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशिष महातळे, उपप्राचार्य सौ. के.ए. रंगारी, प्रा. लीलाधर खंगार, प्रा. नितीन कुकडे, डॉ. के.सी. पाटील, डॉ. दीपिका संतोषवार, डॉ. माया धमगाये, प्रा. विद्या शिंदे, प्रा. माया बिस्ट, प्रा. शरद कुत्तरमारे, प्रा. रविकांत वरारकर, डॉ. प्रविण चटप, प्रा. महेश यार्दी, प्रा. अरूण बर्डे तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## प्रभावती मोगरे यांचे निधन



**चंद्रपूर । प्रतिनिधी**
चंद्रपुरातील प्रसिध्द छायाचित्रकार मुकेश मोगरे यांच्या मातोश्री श्रीमती प्रभावती मुरलीधरराव मोगरे यांचे नुकतेच वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्यावर मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पाच मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंड व बराच मोठा आप्त परिवार आहे.

## ३६ जिल्ह्यांतील १८१ मान्यवरांचा गौरव
## शिर्डीत 'साई कलारत्न समाजभूषण पुरस्कार २०२५'चा भव्य सोहळा संपन्न

**अहिल्यानगर । वजीर शेख**
शिर्डी । ओम साई विकास प्रतिष्ठान आणि बी.बी.सी. फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य निर्मित साई कलारत्न समाजभूषण पुरस्कार २०२५ वितरण समारंभ शनिवार, ३ मे रोजी शिर्डीतील हॉटेल शांतीकमल येथे दिमाखात पार पडला. राज्यभरातून आलेल्या ३६ जिल्ह्यांतील १८१ मान्यवरांचा ट्रॉफी, प्रमाणपत्र, फेटा, शाल, बॅग व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, साईआरती व गणेश वंदनेने झाली. स्वागतगीताने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. या सोहळ्याला संगमनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड, समाजसेवक व हॉटेल उद्योजक किशोरजी कालडा, शिक्षण सम्राट डॉ. दत्तात्रय वाणी, डॉन फार्माचे एम.डी. मुकेश ओबेरॉय, प्रसिद्ध अभिनेते व मिमिक्रीकार अशिष सातपुते, अभिनेता विजय खुरपे, अभय बल्लारपूरे, निर्माता-दिग्दर्शक अल्ताफ शेख यांची उपस्थिती होती.
सांस्कृतिक कार्यक्रमांत प्रिती रजपूत आणि दुर्गा लिलाके यांच्या लावण्या विशेष आकर्षण ठरल्या, तर एका चिमुकलीच्या नृत्याने उपस्थितांचे मन जिंकले. संस्थापक अध्यक्ष सुदाम संसारे यांना 'कला जीवन गौरव' आणि 'प्रेरणा गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
शेवटी लकी ड्रॉ कार्यक्रमात महिलांसाठी १२ पैठणी साड्या, पुरुषांसाठी १२ ड्रेस आणि विशेष सहभागासाठी १५ टी-शर्ट्स देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरिता यांनी केले, तर प्रस्तावना सुदाम संसारे यांनी मांडली. पंचपक्वान्नांच्या भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. ६०० हून अधिक लोकांनी या सोहळ्याचा आनंद घेतला.

## सखुबाई लटपटे यांची गंगाखेड व परभणी विधानसभा महिला संपर्क प्रमुख पदी नियुक्ती

**गंगाखेड । प्रतिनिधी**
शिवसेना पक्षप्रमुख आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार गंगाखेड व परभणी विधानसभा क्षेत्रासाठी महिला संपर्क प्रमुख म्हणून सखुबाई लटपटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती एका वर्षाच्या कालावधीसाठी असून पक्षाच्या महिला संघटनात्मक कामकाजास चालना देण्यासाठी त्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.
सखुबाई लटपटे या हिंदुत्ववादी विचारसरणीला समर्पित राहून, वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार व धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवण यांचा प्रभावी प्रचार व प्रसार करतील, असा पक्षाचा विश्वास आहे.
या नव्या जबाबदारीनुसार, त्यांनी प्रत्येक महिन्यात किमान दोन संपर्क दौरे करणे आवश्यक असून, त्यांचा अहवाल दर महिन्याला बाळासाहेब भवन येथे सादर करावा लागेल. पक्षाच्या या आदेशानुसार आपण निष्ठेने व कार्यक्षमतेने कार्य करत राहू, असा विश्वास लटपटे यांनी व्यक्त केला.या वेळी



शिवसेना नेते शाहूराव मुंढे यांची उपस्थिती होती. त्यांच्या नियुक्तीने स्थानिक महिला कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## शिंगाड्या मोर्चाचा धसका; प्रशासनाने घेतली तातडीने दखल, रस्त्याच्या कामास वेग


**धुळे । उमाकांत अहिरराव**
दोंडाईचा ते साहूर, दाऊळ, झोतवाडे व शेंदवाडे मार्गावरील रखडलेल्या रस्त्याच्या कामाबाबत शिवसेना (उबाठा) गटाचे उपजिल्हाप्रमुख शानाभाऊ सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली ५ मे रोजी शिंगाड्या मोर्चा घेण्याचा इशारा देण्यात आला होता. त्याच्या दोन दिवस आधीच सोनवणे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अभियंता मनिष वाघ यांना निवेदन सादर करून प्रश्न गंभीरतेने मांडला होता. या इशाऱ्याची तातडीने दखल घेत बांधकाम विभागाने प्रत्यक्षात रस्त्याच्या कामास सुरुवात केली आहे.
दोंडाईचा, दाऊळ, झोतवाडे, शेंदवाडे व साहूर या मार्गाचे काम मंजूर असूनही प्रशासन व ठेकेदाराच्या उदासीनतेमुळे ते रखडले होते. या रस्त्यावर अपघात होऊन अनेकांनी जीव गमावले तर अनेक गंभीर जखमी झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर सोनवणे, नरेंद्र भामरे, शैलेश सोनार, लोटन देसले आणि भूषण



सोनवणे यांनी २२ एप्रिल रोजी संबंधित अधिकाऱ्यांना ठोस निवेदन दिले होते.
या निवेदनात निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाईची, त्यांना काळ्या यादीत टाकण्याची व काम दुसऱ्या ठेकेदाराकडे सोपवण्याची मागणी करण्यात आली होती. अखेर या आंदोलनाच्या इशाऱ्याचा परिणाम म्हणून रस्त्याचे काम सुरू झाले असून, सध्या दोंडाईचा ते साहूर मार्गावरील काम वेगाने सुरू असल्याचे बांधकाम विभागाकडून सांगण्यात आले.
शानाभाऊ सोनवणे यांनी स्वतः रस्त्याच्या कामाची पाहणी केली असून, ठेकेदार व अधिकाऱ्यांशी संवाद साधला. हे काम मे महिन्याअखेरीस पूर्ण करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले असून, गुणवत्तेवर कुठलाही तडजोड होऊ नये, अशी ठाम सूचना त्यांनी दिली आहे.कामाला मिळालेली चालना पाहता शिवसेना (उबाठा) गटाने शिंगाड्या मोर्चा तात्पुरता स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती शानाभाऊ सोनवणे व नरेंद्र भामरे यांनी दिली.

## फसव्या प्लेसमेंट कंपन्यांवर लगाम!
## मनसेच्या पाठपुराव्याला यश; महाराष्ट्रात लागू होणार खास नोंदणी कायदा

**मुंबई । विराम पवार**
गावाकडून शहरांकडे रोजगाराच्या शोधात येणाऱ्या तरुणांची फसवणूक करणाऱ्या बनावट नोकरी देणाऱ्या संस्थांवर आता लगाम बसेल. कारण महाराष्ट्रात खासगी नोकरी देणाऱ्या संस्थांसाठी नोंदणी बंधनकारक करणारा कायदा - खासगी रोजगार संस्था नोंदणी कायदा - लवकरच लागू होणार आहे. या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रोजगार आणि स्वयंरोजगार विभागाने सातत्याने पाठपुरावा केला होता.
आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येक तरुणाला स्वतःच्या पायावर उभं राहून कुटुंबाला आधार द्यायचा असतो. ही स्वप्नं घेऊन राज्यातील अनेक तरुण-तरुणी पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर यांसारख्या मोठ्या शहरांकडे येतात. मात्र इथे त्यांच्यासमोर उभा राहतो एक मोठा धोका फसव्या नोकरी देणाऱ्या संस्था.



१०० टक्के नोकरीची हमी, मोठा पगार, विदेशात संधी अशा आमिषांनी हे तरुण गंडवले जातात. हजारोंच्या संख्येने तरुणांकडून हजारो-लाखो रुपये उकळले जातात आणि बदल्यात मिळते फक्त निराशा. गेल्या काही वर्षांत अशा प्रकारांच्या तक्रारींमध्ये झपाट्याने वाढ झाली असून अनेक कुटुंबांचं आर्थिक नुकसान आणि तरुणांचं मनोधैर्यही डळमळलं आहे.या अन्यायाविरुद्ध मनसेच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाने राज ठाकरे यांच्या सहीसह एक निवेदन तत्काली मुख्यमंत्री यांना सादर केलं. त्यानंतर या मागणीचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. अखेर हा कायदा मंजूर करण्यात आला आहे.
आसाम, मिझोराम आणि छत्तीसगड या राज्यांनंतर महाराष्ट्र हा चौथा राज्य असेल जिथे हा कायदा लागू होईल. आता राज्यातील सर्व खासगी नोकरी देणाऱ्या संस्थांची नोंदणी सक्तीची असेल, आणि फसवणूक करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई होणार आहे.या ऐतिहासिक यशामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या आणि विशेषतः रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या कार्याची दखल राज्यभर घेतली जात आहे.

## ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी महासंघाची स्थापना; निस्वार्थ सेवेचा संकल्प



**पाटस (दौंड) । योगेश राऊत**
नागनाथ ज्येष्ठ नागरिक संघाच्या पाटस येथील सभागृहात दिनांक ४ मे २०२५ रोजी पुणे-सातारा-सोलापूर-अहिल्यानगर विभागीय ज्येष्ठ नागरिक संघाच्या शिखर समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. अध्यक्षस्थानी डॉ. पांडुरंग श्रीपतराव लाड होते. या ऐतिहासिक बैठकीत ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी महासंघ या नावाने एक नवी संघटना स्थापन करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.
या महासंघाची नोंदणी पुणे येथील धर्मदाय आयुक्त कार्यालयात त्वरित करण्यात येणार असून त्याचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्रभर विस्तारित असेल. कोणत्याही जाती, धर्म, पंथ वा राजकीय विचारधारेच्या पलिकडे जाऊन निस्वार्थ सेवेचा निर्धार हा या संघटनेचा मुख्य उद्देश असेल, असे ठाम मत सर्व सदस्यांनी व्यक्त केले.
या बैठकीत डॉ. पांडुरंग लाड (पाटस - पुणे), गुरुलिंग कन्नूरकर (सोलापूर), आनंदराव शिंदे (फलटण - सातारा) यांनी आपले मार्गदर्शन करत ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांवर विचार मांडले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांमुळे उपस्थितांना नवचैतन्य लाभले.पुणे, सातारा, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यांतील प्रमुख पदाधिकारी व प्रतिनिधींच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. नव्याने स्थापन होणाऱ्या महासंघाच्या माध्यमातून राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी अनेक विधायक उपक्रम राबवले जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.समाजसेवा हीच ईश्वरसेवा व सत्यमेव जयते या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवत कार्य करणाऱ्या या महासंघाच्या स्थापनेमुळे राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाचा ९५.३२ टक्के निकाल

**सोलापूर । प्रतिनिधी**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या मार्च २०२५ मध्ये झालेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या निकालात करमाळा येथील विद्या विकास मंडळाच्या यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाने ९५.३२ टक्के घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल ९८.५२ टक्के, वाणिज्य शाखेचा ९७.७७ टक्के तर कला शाखेचा निकाल ९२.०१ टक्के लागला आहे. या निकालामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली असून, विज्ञान शाखेत कुमारी भक्ती सतीश कोंडलकर हिने ७३.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. कुमारी सिद्धी यशवंत व्हरे हिला ७३.५० टक्के गुण मिळाले असून ती दुसऱ्या क्रमांकावर राहिली, तर कुमार विक्रमादित्य बाळासाहेब कोळेकर याने ७३.१७ टक्के गुणांसह तिसरा क्रमांक मिळवला.
वाणिज्य शाखेत कुमारी मानसी हेतल



वासानी हिने ९०.६७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. तिच्यानंतर कुमारी अमृता नितीन सांगळे हिला ८७.१७ टक्के गुण मिळून द्वितीय क्रमांक प्राप्त झाला, तर कुमारी अनुष्का संतोष चौगुले हिने ८५.५० टक्के गुणांसह तिसरा क्रमांक पटकावला. कला शाखेमध्ये कुमारी संजना अनिल मारडकर हिने ८८.०० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला असून कुमारी पूजा राजेंद्र गोरे हिला ८६.५० टक्के गुण मिळाले. तिच्या खालोखाल कुमारी गुलनाज अबूबकर शेख हिला ८२.३३ टक्के गुण मिळाले.
या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव विलासराव घुमरे , अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक आणि कनिष्ठ विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# विद्या विकास कनिष्ठ महाविद्यालय हिंगणघाट-बारावीचा निकाल ९३.५१%

## श्रेणीतील सर्व विभागात उल्लेखनीय यश; श्रावणी लेडे, श्रुतिका घिये व भाग्यश्री भोयर ठरल्या टॉपर






**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट येथील विद्या विकास कनिष्ठ महाविद्यालयाचा इयत्ता बारावीचा निकाल यंदा अत्यंत उल्लेखनीय ठरला आहे. एकूण २६२ विद्यार्थ्यांपैकी २४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून संस्थेचा एकूण निकाल ९३.५१ टक्के लागला आहे. विज्ञान, वाणिज्य आणि कला या तिन्ही शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली आहे. वाणिज्य शाखेतील लेडे श्रावणी शंकर हिने ८७.३३ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. विज्ञान शाखेतून घिये श्रुतिका गणेश हिने ७१.१७ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश मिळवले, तर कला शाखेतील भोयर भाग्यश्री दत्तूजी हिने ६९.३३ टक्के गुण प्राप्त करून आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली. विभागवार निकालात विज्ञान शाखेचा निकाल सर्वाधिक म्हणजेच ९७.३३ टक्के लागला असून, वाणिज्य शाखेचा ९३.६७ टक्के व कला शाखेचा ७५.७५ टक्के निकाल लागला. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद व संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# भारत उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९८.३८ टक्के; व्यवसाय अभ्यासक्रमातही यशाची घोडदौड


साक्षी उमेश महाजन ७२.३३%


मयुर राष्ट्रपाल पाटील ७२.३३%


आर्यन हिरासिंग बघेल ७२.००%

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

भारत उच्च माध्यमिक विद्यालयाने यावर्षीच्या एच.एस.सी. (बारावी) परीक्षेत ९८.३८ टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. शालेय विद्यार्थ्यांनी मेहनतीने उल्लेखनीय यश मिळवत विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे.

विज्ञान विभागातील साक्षी उमेश महाजन हिने ७२.३३ टक्के गुण मिळवून विभागातून प्रथम क्रमांक मिळवला. तर उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमात विद्युत विभागाचे मयूर पाटील याला ७२.३३% गुण प्राप्त झाले असून आर्यन बघेल यानेही ७२% गुणांसह यश मिळवले.

व्यवसाय अभ्यासक्रमाचा एकूण निकाल ९२.३० टक्के लागला असून, यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करत शाळेच्या यशात मोलाची भर घातली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापकांसह शिक्षकवृंदांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# आर.के.कनिष्ठ महाविद्यालयाचा एचएससी बोर्डात घवघवीत यश



**पुलगाव । प्रतिनिधी**

फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एचएससी परीक्षेचा निकाल नुकताच नागपूर मंडळाद्वारे जाहीर करण्यात आला. आर.के. कनिष्ठ महाविद्यालयाने नेहमीप्रमाणे यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा जपत ९४.९१% उत्तीर्णता मिळवली आहे. एकूण ४७२ विद्यार्थ्यांपैकी ४४८ विद्यार्थी यशस्वी ठरले.

महाविद्यालयाच्या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन शाळा समितीचे अध्यक्ष रंजनकुमारजी केजडीवाल, आर.के. हायस्कुल ट्रस्टचे अध्यक्ष हरीप्रकाशजी केजडीवाल, तसेच इतर विश्वस्त व शिक्षकांनी केले. प्राचार्य सुनील भोयर, उपमुख्याध्यापक गणेश शर्मा, उपप्राचार्य अजय कोयाळ यांसह शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### विभागानुसार निकाल

**विज्ञान (अनुदानित): १००% निकाल**
**प्रथम क्रमांक: सोनल रवींद्र गांजरे – ५६६ गुण (९४.३३%)**
**विज्ञान (अंशतः अनुदानित): ९८.६९%**
**प्रथम क्रमांक: रौनक पवनकुमार लुंकड – ५०० गुण (८३.३३%)**
**वाणिज्य (इंग्रजी माध्यम): १००%**
**प्रथम क्रमांक: यशिका घनश्याम खोरिया – ५६६ गुण (९४.३३%)**
**वाणिज्य (मराठी माध्यम): ९१.१३%**
**प्रथम क्रमांक: देवयानी विलास भोंगेकर – ४५५ गुण (७५.८३%)**
**कला विभाग: ८१.४८%**
**प्रथम क्रमांक: स्वराज वसंत तिडके – ४४९ गुण (७४.८३%)**



### संगणक अभियंता होण्याचे स्वप्न-सोनल गांजरे

**शेतकरी कुटुंबातील सोनल गांजरे हिने विज्ञान शाखेतून ९४.३३% गुणांसह जिल्ह्यात पहिला क्रमांक मिळवून कौतुकास पात्र ठरली आहे. तिचे वडील शेतकरी, आई गृहिणी असून, भावंडांमध्ये ती मोठी आहे. सोनलचा संगणक अभियांत्रिकी क्षेत्रात प्रवेश घेण्याचा मानस असून ती यशस्वी संगणक अभियंता होण्यासाठी प्रयत्नशील आहे.**

# पाटबंधारे विभागाची गळचेपी भूमिका शेतकऱ्यांच्या मुळावर !

## भरत अवताडे यांचा तीव्र आंदोलनाचा इशारा



**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील २४ गावांची वरदायीनी असलेल्या दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या अपूर्ण कामांसाठी तत्कालीन आमदार संजयमामा शिंदे यांनी ११६ कोटी निधी मंजूर करून आणून त्याचे काम डिसेंबर २०२३ मध्ये सुरू केले होते. परंतु नोव्हेंबर २०२४ मध्ये करमाळा तालुक्यात सत्तांतर झाल्यानंतर दहिगाव योजनेचे सुरू असलेले काम जानेवारी २०२५ मध्ये बंद पडले.

हे बंद पडलेले काम सुरू करावे, या मागणीसाठी शेतकऱ्यांना पाटबंधारे विभागाला रीतसर पत्र दिले होते. तथापि, काम सुरू न झाल्यास जनआंदोलन उभे करण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भरत अवताडे यांनी दिला. परंतु पाटबंधारे विभाग याविषयी गळचेपी भूमिका घेत असल्यामुळे शेतकरी उध्वस्त होण्याची वेळ आली आहे.

दहिगाव योजनेचे काम एप्रिल २०२५ अखेर सुरू झाले. परंतु एकाच दिवशी जेऊरच्या गावगुंडांनी येऊन ते काम बंद केले. यासंदर्भात पाटबंधारे विभाग, करमाळा पोलीस स्टेशन यांना माहिती आहे. कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक यांच्या सूचनेनुसार पोलिसांनी काम बंद पडलेल्या ठिकाणी जाऊन माहिती घेतली. मात्र दुर्दैवाने गुन्हा दाखल करण्यासाठी एकही कर्मचारी पुढे आले नाही. जळीत पाईप प्रकरणात अज्ञातावर गुन्हा दाखल केला गेला होता, तरीही संबंधित गुन्हा दाखल करण्यासाठी कोणताही ठोस पाऊल उचलले गेले नाही.काम बंद पाडणारे गावगुंडांची नावे पोलिसांकडे दिली आहेत, परंतु पाटबंधारे विभाग या बाबतीत तक्रार करायला पुढे येत नाही. त्यामुळे सरकारी कामात अडथळा म्हणून गुन्हा दाखल होत नाही. याचाच गैरफायदा लोकप्रतिनिधीने पोसलेले गावगुंड घेत आहेत.

आता, या गळचेपी भूमिकेविरोधात १६ मे रोजी अर्जुननगर फाटा येथे सकाळी १० वाजता रास्ता रोको आंदोलन आयोजित करण्यात आले आहे, असे भरत अवताडे यांनी जाहीर केले आहे.

> **“ MH 42 Q 3141 या गाडीतून ६ गावगुंड आले आणि त्यांनी २६ एप्रिल रोजी दहिगाव उपसा सिंचन योजनेची डावी वितरिका क्र.१ चे पांडे हद्दीत सबस्टेशन लगत सुरू असलेले काम बंद पाडले. पोलिसांनी पाहणी केली असून गाडी नंबर व गाडीतील दोघांची ओळख पटलेली आहे. तथापि, पाटबंधारे विभाग गुन्हा दाखल करण्यासाठी पुढे यायला तयार नाही.**
> **–एस.बी. बिचितकर,कंत्राटदार प्रतिनिधी**

# जिल्हास्तरीय तायक्वाँदो चँपियनशिप स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन व यशस्वी आयोजन

## युवक-युवतींसाठी क्रिडा क्षेत्रातील संधींचे दालन खुले-इम्रान राही यांचे प्रतिपादन





**वर्धा । प्रतिनिधी**

जिल्हा तायक्वाँदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र्च्या वतीने जिल्हास्तरीय तायक्वाँदो चँपियनशिप स्पर्धेचे आयोजन ४ मे रोजी एशियन कम्युनिटी सेंटर हॉल येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या स्पर्धेत जिल्ह्यातील अनेक युवा खेळाडूंनी सहभाग घेतला.

या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षक इम्रान राही उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, तायक्वाँदो हा केवळ खेळ नसून शिस्त, आत्मसंरक्षण आणि मानसिक विकासाचा मार्ग आहे. युवकांनी या संधींचा लाभ घ्यावा.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवीण चोरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून अँड. स्वाती गेडे, श्रीमती ललितताई वाघ,उल्हास वाघ, रुजा गायकोस आणि प्रशिक्षक रेफरी भोंगळे मंचावर उपस्थित होते.या वेळी प्रवीण चोरे यांनी खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास साधता येतो, असे सांगत जिल्ह्यातील खेळाडूंनी राज्य तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावे अशी अपेक्षा व्यक्त केली.कार्यक्रमाचे संचालन अध्यक्ष अमोल मानकर यांनी केले आणि आभार सचिव साहील वाघ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवराज पाचूरे, हर्षली चौधरी, मिहीर वाघ, रेखा वाघ, शितल लांडुरकर, विलास वानखडे, प्रेम कंकड, आर्यन छपकेर, आर्यन वानखेडे यांचे मोलाचे योगदान लाभले.

# इंडियन मिलिटरी स्कूल,हिवरा (हो.) पुलगाव-१२वीचा निकाल जाहीर

## विद्यार्थ्यांनी यशाच्या मार्गावर आत्मविश्वासाने टाकले पाऊल






**पुलगाव । प्रतिनिधी**

इंडियन मिलिटरी स्कूल, हिवरा (हो.), तालुका पुलगाव, जिल्हा वर्धा येथील १२वीचा निकाल मार्च २०२५ मध्ये जाहीर झाला असून विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. यावर्षीच्या निकालात शाळेतील वंश गजमान हाके याने ६०० पैकी ४१४ गुण (६९.००%) मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. आर्यन तीर्थराज अर्थशील याने ४०४ गुण (६७.३३%) मिळवून दुसरा क्रमांक, तर साहिल विलासराव गेडाम याने ४०२ गुण (६७.००%) मिळवत तिसरा क्रमांक मिळवला.शाळेच्या या निकालाबद्दल मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. हे यश विद्यार्थ्यांच्या मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्याचे फळ असल्याचे सांगण्यात आले.

# सेंट जॉन हायस्कूल,पुलगावचा १२वीचा निकाल शंभर टक्के

## यशबोध ज्ञान प्रबोधिनीच्या शाळेने सलग यशाची परंपरा कायम राखली


Pranay Ganesh Fulkari
90.83


Kartik samir Tikhe
85.00


Hrishi Sanjay Gupta
84.67


Rutuja Anil kharabe
83.33



Pragati Sunil Umak
80.17

**पुलगाव । प्रतिनिधी**

यशबोध ज्ञान प्रबोधिनी द्वारा संचालित सेंट जॉन हायस्कूल, पुलगावच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या १२वीच्या परीक्षेत उत्तुंग भरारी घेतली आहे. यावर्षीही शाळेने १००% निकालाची परंपरा कायम ठेवत आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली.या यशात प्रथम क्रमांक मिळवला मास्टर प्रणय गणेश फुलकरी यांनी, ज्याने ९०.८३% गुण मिळवून शाळेचे नाव उज्ज्वल केले. दुसऱ्या क्रमांकावर मास्टर कार्तिक समीर तिखे (८५.००%) तर तिसऱ्या क्रमांकावर मास्टर रिषी संजय गुप्ता (८४.६७%) यांनी बाजी मारली. चौथा क्रमांक कु. ऋतुजा अनिल खराबे (८३.३३%) आणि पाचवा क्रमांक कु. प्रगती सुनील उमक (८०.१७%) यांनी पटकावला.

शाळेच्या निकालातील वैशिष्ट्य म्हणजे ९०% पेक्षा अधिक गुण मिळवणारा १ विद्यार्थी, ७५% पेक्षा अधिक गुण असलेले ६ विद्यार्थी, ६०% पेक्षा अधिक गुण मिळवलेले २० विद्यार्थी आणि ४५% च्या वर ७८ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.शाळेच्या अध्यक्षा प्रीती बोरसे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शाळेचे प्रबंध संचालक चंद्रशेखर इंगळे, प्राचार्य संतोष यादव ,उपप्राचार्या आरती कुरझडकर,उपप्राचार्य महेंद्र भोयर तसेच सर्व शिक्षकवर्ग यांनी विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले व मार्गदर्शन केले.

# देवळी शहरातून सायन्स विभागात सृजन कॉलेजच्या इशिका सोनीचा प्रथम क्रमांक



**देवळी । प्रतिनिधी**

जाहीर झालेल्या बारावी (एच.एस.सी.) बोर्डाच्या निकालात देवळी शहरातील विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले. विज्ञान शाखेत सृजन कॉलेज ऑफ सायन्स, देवळीची विद्यार्थिनी इशिका गोपाल सोनी हिने ९०.६७ टक्के गुण मिळवून शहरातून प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या यशामुळे कॉलेजसह संपूर्ण शहरात आनंदाचे वातावरण आहे.

ज्ञानभारती कॉलेजचा आयुष तिरले ८९.१७ टक्के गुणांसह दुसऱ्या स्थानी तर सृजन कॉलेजचाच अथर्व पंकज चोरे ८५.५० टक्के गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर राहिला. ज्ञानभारती सायन्स कॉलेजची सृष्टी गावंडे हिनेही ८५.५० टक्के गुण मिळवून चौथा क्रमांक पटकावला. मारिया कला व विज्ञान ज्युनिअर कॉलेजचा विनय सावलकर याने ८३.१७ टक्के गुणांसह पाचवे स्थान मिळवले.कला शाखेत जनता ज्युनिअर कॉलेजची अमृता खोडे हिने ८७.८३ टक्के गुण मिळवून शहरातून प्रथम क्रमांक मिळवला. त्याच कॉलेजची प्रियंका गोंदाने हिने ८६.६७ टक्के गुणांसह दुसरा आणि पायल नखाते हिने ८४.०० टक्के गुणांसह तिसरा क्रमांक पटकावला.शालेय निकालाबाबत बोलायचे झाल्यास, कला शाखेत नगर परिषद ज्युनिअर कॉलेजने ८६.११% निकाल देत सर्वाधिक यश संपादन केले. जनता कॉलेजचा निकाल ८३.६९% आणि एस.एस.एन.जे. कॉलेजचा निकाल ६८.४२% होता.विज्ञान शाखेत मारिया ज्युनिअर कॉलेज व जनता ज्युनिअर कॉलेजने १००% निकालाची परंपरा कायम राखली आहे. ज्ञानभारती कॉलेजचा निकाल ९९.५% आणि सृजन कॉलेजचा ९७.९१% इतका लागला आहे.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे समाजातून आणि शिक्षण क्षेत्रातून भरभरून अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## खरीप हंगाम-२०२५ तयारीसाठी धोरणात्मक बैठक ;शेतकऱ्यांच्या हितासाठी ठोस पावले

# शेतकऱ्यांच्या हितासाठी आमदार मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली निर्णयांची आखणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यात खरीप हंगाम २०२५ पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी नियोजन भवन सभागृहात आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले. कृषी, सिंचन, शासकीय योजनांची अंमलबजावणी, शेतकऱ्यांच्या समस्या व उपाययोजना यावर सखोल चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांना योजनांचा लाभ अधिक सुलभतेने मिळावा यासाठी विविध उपाययोजना, तांत्रिक सेवा, अनुदानवाढ, नव्या यंत्रणा व कृषी अभियानाची आखणी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली धोरणात्मक बैठक पार पडली.

नियोजन भवन सभागृह येथे खरीप हंगाम-२०२५ आढावा घेण्यात आला. बैठकीत जिल्हाधिकारी विनय गौडा, उपविभागीय अधिकारी संजय पवार, रवींद्र माने(राजुरा), अजय चरडे(मुल), जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, चंद्रपूरचे तहसीलदार विजय पवार, तहसीलदार(मुल) मृदुला मोरे, तहसीलदार( बल्लारपूर) रेणुका कोकाटे, तहसीलदार (पोम्भुर्णा) रेखा वाणी, मनपा अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, मुलचे मुख्याधिकारी संदीप दोडे, बल्लारपूरचे मुख्याधिकारी विशाल वाघ, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदीप बाराहाते तसेच मतदारसंघातील सर्व तालुका कृषी अधिकारी तसेच गट विकास अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले, शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅक पोर्टलला भेट देऊन 'फार्मर आयडी'ची नोंदणी करणे अत्यावश्यक आहे, या नोंदणीमुळे विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवणे सुलभ होईल ; यासाठी कृषी विभागाने व्यापक जनजागृती करून विशेष अभियान राबवावे. पोंभुर्णा तालुक्यात पीएम किसान योजनेअंतर्गत १०,३५० लाभार्थ्यांना लाभ वितरित करण्यात आला आहे. जिल्ह्यात ५२ तलाठी कार्यालये उभारली जात असून, त्यामध्ये मुख्यालयातील प्रमुख गावांमध्ये कृषी सहाय्यकांसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. प्रत्येक कृषी कार्यालयामध्ये पिकासंबंधी माहिती देणारे क्यूआर कोड लावावेत. तसेच, कृषी विभागाने येणाऱ्या खरीप हंगामात बियाणे व खतांची टंचाई भासू नये यासाठी आवश्यक ती दक्षता घेऊन त्यांची मुबलक उपलब्धता सुनिश्चित करावी. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत गावांची निवड कोणत्या निकषांच्या आधारे केली जाते, याची माहिती आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी बैठकीत जाणून घेतली.

सोलापूर येथे निंबोळी अर्क व खते तयार करणारी स्वतंत्र कंपनी कार्यरत आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या अडीअडचणी वेळेवर जाणून घेऊन त्यांचे त्वरित निराकरण करावे, तसेच कोणत्याही उणिवा, कमतरता किंवा त्रुटी असल्यास त्या आगामी जिल्हास्तरीय खरीप आढावा बैठकीत सोडवता येतील. पिक विमा, धानाचा बोनस, पीक कर्ज तसेच खत लिंकेज संदर्भातील तक्रारी प्राप्त झाल्यास त्यावर त्वरित कार्यवाही करणे अपेक्षित आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांचा खर्च वजा जाता प्रत्येक पिकाच्या



उत्पादनाचा निव्वळ नफा (नेट प्रॉफिट) सादरीकरणामध्ये स्वतंत्र कॉलम समाविष्ट करावा, जेणेकरून,अचूक माहिती मिळू शकेल. कृषी क्षेत्रातील तज्ञांची तालुकास्तरावर समिती नेमण्याची आवश्यकता आहे. कृषी विभागातील रिक्त पदे ही एक महत्त्वाची समस्या आहे; त्यामुळे या रिक्त पदांचा एकत्रित अहवाल तयार करून जिल्हा व राज्यस्तरीय खरीप बैठकीत सादर करता येईल.पोंभुर्णा तालुक्यातील सात शेतकऱ्यांनी राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त केला असून, ही बाब अत्यंत अभिमानास्पद आहे; यासाठी महाराष्ट्रात पुरस्कारांच्या बाबतीत बल्लारपूर विधानसभेने नेहमीच आघाडीवर राहावे. सिंचनासाठी शेतात पाणी आणण्यासाठी नहर अथवा पाटचाऱ्या उभाराव्यात. खतांच्या बाबतीत फार्मर प्रोड्युसर कंपन्यांना कृषी सेवा केंद्राचे लायसन्स देण्याची आवश्यकता आहे. पट्टा पद्धतीच्या तुलनेत पेरीव पद्धतीने उत्पादन जास्त मिळते आणि खर्च कमी होतो, हे शेतकऱ्यांना समजावून सांगण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी त्यावर जोर द्यावा. केरळमध्ये कृषी आर्मी तयार करण्यात आलेली आहे, त्या धर्तीवर बल्लारपूरमध्ये कृषी आर्मी तयार करण्यासंबंधी कार्यवाही करणे आवश्यक आहे. यासाठी ड्रेसकोड, ट्रॅक्टर, ड्रोन आणि यंत्रसामग्री याबाबत नियोजन करण्यात यावे. नकली बियाण्यांचा प्रश्न त्वरित सोडवावा, तसेच वन डिस्ट्रिक्ट वन प्रोडक्ट योजनेसाठी सेमिनार आयोजित करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर, भाताच्या विविध प्रजातींबाबत शेतकऱ्यांना माहिती देणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले.शेतकरी बांधवांना सॉइल हेल्थ कार्ड प्रदान करण्याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे, यासाठी डीपीडीसी मधून निधी उपलब्ध करून देणे शक्य आहे. तसेच, नायट्रोजनसाठी नैसर्गिक सोल्यूशन तपासण्याची गरज आहे, आणि अॅझोला खताच्या बाबतीत बचत गटांना काम देण्याचा पर्याय तपासावा. पोखरामध्ये विशेष लक्ष देऊन बैठक घेण्यात येईल. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी समिती नेमण्याची आवश्यकता आहे. गत चार ते पाच वर्षांत कृषी क्षेत्रात दिले जाणाऱ्या पुरस्कारांची माहिती मिळवावी.शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी ठोस टार्गेट निश्चित करण्याची गरज आहे. काही शेतकरी लागण झाल्यानंतर पिकांचे नियंत्रण करतात, मात्र प्राथमिक स्तरावरच उपाययोजना करण्यात यावी यासाठी कृषी विभागाने आवश्यक सल्ला द्यावा. कृषी क्षेत्रात मतदारसंघ आघाडीवर राहावा यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने कार्य करण्याची आवश्यकता आहे.


पंजाब नॅशनल बँकेच्या माध्यमातून अजयपूर येथे महाराष्ट्रातील पहिले प्रशिक्षण केंद्र उभारले जात आहे; तसेच ८० कोटी रुपये खर्चून चंद्रपूर येथे आधुनिक बाजारहाट उभारण्यात येत असून, मतदारसंघातील उर्वरित ग्रामपंचायत मध्ये इमारतींचे बांधकाम सुरू आहे. शेतकऱ्यांसाठी उत्तम कृषी कार्यालये, प्रशिक्षणाची प्रात्यक्षिके व बसण्याची सोय करण्यात येत आहे.भात उत्पादक शेतकऱ्यांसाठी कार्यशाळांचे आयोजन करणे आवश्यक आहे. बल्लारपूर येथे १० एकर जागेमध्ये अत्याधुनिक कृषी उत्पन्न बाजार समिती उभारण्यात येत आहे. चंद्रपूर जिल्ह्यासाठी पॅकहाऊस योजनेचे पुनर्जीवन करण्यात येणार आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील शेतीची भौगोलिक माहिती व गोषवारा सादर करावा. मतदारसंघातील हाफार्मर प्रोड्यूसर कंपनीसाठी स्वतंत्र बैठक घेण्यात यावी. शेततळ्याच्या अनुदानात वाढ करून ते ७५ हजार रुपयांवरून अधिक करण्यात येईल. असेही ते म्हणाले.

# वादळी वाऱ्यासह गारपिटीने उन्हाळी धान पिकाचे प्रचंड नुकसान

## नुकसान भरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी

**तळोधी (बा) । प्रतीनिधी**

नागभीड तालुक्यात मोठ्या प्रमाणात सिंचन सुविधा असलेल्या शेतकऱ्यांनी उन्हाळी बारीक आणि ठोकळ धान पिकाची लागवड केली होती. रब्बी हंगामात म्हणजेच उन्हाळी धान पिकाची जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात लागवड केली गेली होती. सध्या धानाचा कालावधी होत असताना शेतकऱ्यांना उन्हाळी धान पीक हातात येण्याची आशा होती. परंतु अस्मानी संकटाने दोन दिवसापासून शेतकऱ्यांचा घात केला आहे. ऐन तोंडाचा घास अवकाळी पावसाने हिरावून घेतला आहे.





शनिवारी सायं ४ वाजता नागभीड तालुक्यात वादळी वाऱ्यासह आणि विजेच्या गडगडाने जोरदार गारपिटीसह अवकाळी पाऊस पडला. यामुळे शेतकऱ्यांचे धान पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. नागभीड तालुक्यातील वाढोणा, उश्राळ मेंढा, जीवनापूर टोला, आकापूर, गंगासागर हेटी, बाळापुर तसेच इतर काही गावांमध्ये वादळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या तोंडात आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. यामुळे इस हंगामात गारपिटीमुळे जवळपास ७० ते ८० टक्के धान जमिनीवर पडून गेले आहे. या नुकसानीमुळे उन्हाळी धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांची मागणी आहे की, शासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी.


# बारावीच्या परीक्षेत आनंद निकेतन कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे नेत्रदीपक यश

**वरोरा । प्रतिनिधी**

नुकत्याच जाहीर झालेल्या बारावी बोर्डाच्या परीक्षेत दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आनंद निकेतन कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले. महाविद्यालयाचा एकंदर निकाल ९६.२२ टक्के आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९८.७५टक्के, वाणिज्य शाखेचा निकाल ९७.१९टक्के , आणि कला शाखेचा निकाल ८६.१३ टक्के लागला.



अभिश्री नलगिंटवार
९०.१७%



अथर्व मिश्रा
९७.१७%



सर्वेश बाहेती
९१.१७%



स्वरांजली चौधरी, ७६.८३%

विज्ञान शाखेतून कुमारी अभिश्री नलगिंटवार ९०.१७ टक्के घेऊन प्रथम आली, तर वाणिज्य शाखेतून ऋषिकेश मिश्रा ९७.१७ टक्के आणि सर्वेश बाहेती ९१.६७ टक्के मिळवून क्रमांकाने पहिल्या स्थानावर आहेत. कला शाखेतून स्वरांजली चौधरी ७६.८३ टक्के घेऊन प्रथम आली.

सर्व गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करणारे महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे, कौस्तुभ आमटे, पल्लवी आमटे, प्राचार्य डॉ. मृणाल काळे, उपप्राचार्य राधा सवाने, तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पोटेगाव बांधाऱ्याची कामाची पहाणी करण्यासाठी कार्यलीन स्टाफ ची हजेरी

**सोलापूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील एकेकाळी नावाजलेला, परंतु आजतागायत खिचपत पडलेला पोटेगाव कोल्हापूर पद्धतीचा बंधारा, याच्या दुरुस्तीचे काम आता जोरात सुरू आहे. सुरुवातीला निधी अभावी, टीएस अभावी, टेंडर अभावी, आणि वर्क ऑर्डर अभावी हे काम संथ गतीने सुरू होते. परंतु शेवटी, कामास यश मिळाले आहे आणि आता पावसाळा फक्त ३० ते ४० दिवस बाकी असून, पावसाच्या अगोदर हे काम पूर्ण करणे हे ठेकेदारांसाठी एक मोठे आव्हान आहे. ठेकेदार भारत थिटे यांनी हे आव्हान स्वीकारले असून, ते कामाला लागलेले दिसत आहेत.

आज वर्किंग डे ला सोलापूरहून चार तालुक्यातील चार्ज असलेले उप अभियंता बाबासाहेब यांनी



कामाची प्रत्यक्ष पहाणी करण्यासाठी पोटेगाव येथे भेट दिली. त्यांच्या समवेत ज्यु. इंजिनियर के. एस. सौंदणे, केनॉल इन्स्पेक्टर अतुल एस. दाभाडे, केनॉल इन्स्पेक्टर एस. बी. पवार, ठेकेदार भारत थिटे, सब कॉन्ट्रॅक्टर अतुल देवकर, श्रीधर गायकवाड, जगन्नाथ गायकवाड, आणि अविनाश गायकवाड आदी उपस्थित होते.

# सह्याद्री मार्शल आर्ट असोसिएशन व सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान आयोजित एकदिवसीय उन्हाळी शिबिर उत्साहात संपन्न

**रोहा । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील धाटाव क्रीडा संकुल येथे सह्याद्री मार्शल आर्ट असोसिएशन आणि सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून एकदिवसीय उन्हाळी शिबिर उत्साहात पार पडले.




मैदानी खेळांमध्ये विद्यार्थ्यांना आवड निर्माण व्हावी, यासाठी कराटे आणि लाठी काठी प्रशिक्षण शिबिर रविवार, ४ मे २०२५ रोजी रोहातील धाटाव क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आले होते.सह्याद्री मार्शल आर्ट असोसिएशनचे संस्थापक राकेश पाटील, सह्याद्री मार्शल आर्ट असोसिएशन महाराष्ट्र राज्याचे श्रीकांत ठाकुर, उपाध्यक्ष राजेंद्र मोरे, ओंकार हजारे, ऋषल गोवर्धने आणि त्यांच्या संपूर्ण टीमने अत्यंत उत्कृष्ट नियोजन करून प्रशिक्षण दिले आणि कार्यक्रम विनाअडथळा पार पाडला.

सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक रोशन चाफेकर, सुराज्यचे सदस्य अनिल घरजाळे, रिया कासार, श्रेयस सोनवणे, भरत ठाकरे, संस्कार मोकल, करण सोनुणे यांच्यासह सर्वांनी या ठिकाणी उपस्थित राहून विशेष योगदान दिले. फक्त एक दिवसात आवाहन करून सुद्धा शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. जवळजवळ ५० मुले-मुलींनी या शिबिरामध्ये सहभाग घेतला होता.या शिबिरासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे, महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अलिबाग, आणि तालुका क्रीडा संकुल समिती यांचे विशेष योगदान लाभले.

# रिटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाचे आदेश आमदार नारायण आबा पाटील यांच्या पाठपुराव्यास यश

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील नियोजीत रिटेवाडी उपसा सिंचन योजनेचे तातडीने सर्वेक्षण करा, असे आदेश पाटबंधारे खात्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. यामुळे या योजनेच्या सर्वेक्षणातील अडथळे दूर होऊन, योजनेच्या जमिन स्तरावरील कामाचा लवकरच प्रारंभ होईल, अशी माहिती आमदार नारायण आबा पाटील यांनी दिली.

आमदार पाटील यांनी आज (६.मे)अहिल्यानगर येथील कुकडी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत या योजनेचा मुद्दा उपस्थित केला होता. या बैठकीस विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, आमदार रोहित पवार, आमदार विक्रम दादा पाचपुते, आ. दिलीप वळसे पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, तसेच कुकडी प्रकल्प संबंधित प्रमुख अधिकारी उपस्थित होते.आमदार पाटील यांनी सांगितले की, कुकडी कालवा सल्लागार समितीच्या दोन्ही बैठकीत या योजनेचा मुद्दा मांडला आहे. मागील बैठकीतही यावर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. याप्रकारे, नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी रिटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाचे आदेश दिले, ज्यामुळे योजनेच्या कार्यस्थळावर शासनाकडून अधिकृत सर्वेक्षण होईल.हे सर्वेक्षण आणि त्यानंतरचे कार्य पुढील कामाची दिशा ठरवेल, असे आमदार पाटील यांनी स्पष्ट केले. त्यांनी याबाबत पुढेही पाठपुरावा करत योजनेची कार्यपुर्तता सुनिश्चित करण्याचे आश्वासन दिले. याबरोबरच, करमाळा तालुक्यातील उत्तर भागातील हजारो एकर क्षेत्रासाठी उजनी धरणातून पाणी मिळवण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू ठेवण्याचे त्यांनी सांगितले.नियोजित रिटेवाडी उपसा सिंचन योजना ही आमदार नारायण आबा पाटील यांची ड्रीम प्रोजेक्ट आहे, आणि या योजनेसाठी सुरूवातीपासूनच त्यांनी घेतलेला पाठपुरावा यशस्वी ठरला आहे.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .